| MHOS100006782024 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | :- | ०६/१०/२०२१ | | |
| | नोंदणी दिनांक | :- | ०६/१०/२०२१ | | |
| | निकाल दिनांक | :- | ०९/०६/२०२६ | | |
| | कालावधी | :- | वर्षे | महिने | दिवस |
| | | | ०४ | ०८ | ०३ |

**भाग अ**

**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, वाशी, ता.वाशी, जि. उस्मानाबाद यांचे न्यायालयात**

(पीठासीन अधिकारी – श्रीमती एम. व्ही. पाटील–राठोडे)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १९७/२०२१.** **निशाणी क्र.४२.**

**वाशी पोलीस स्टेशन गु.नों.क्र. १८४/२०२१.**

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत – पोलीस ठाणे अंमलदार,<br>पोलीस ठाणे, वाशी, ता.वाशी,<br>जिल्हा उस्मानाबाद |
| अभियोग पक्षातर्फे सुविद्य वि.स.स.अभियोक्ता | | श्री. एस.आर. सय्यद |
| **विरुध्द** | | |
| आरोपी | | अक्षय संतराम तोडकर,<br>वय – २३ वर्षे, धंदा – चालक,<br>रा. गोजवडा, ता.वाशी, जि.उस्मानाबाद. |
| आरोपींतर्फे सुविद्य विधिज्ञ | | श्री. पी. बी. कवडे, विधीज्ञ. |

**भाग ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०६/०६/२०२१ |
| गुन्हा दाखल दिनांक | ०९/०६/२०२१ |
| दोषारोप दाखल दिनांक | ०६/१०/२०२१ |
| दोषारोप तयार केल्याचा दिनांक | ११/०३/२०२४ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | २४/०९/२०२४ |
| न्यायनिर्णयास ठेवल्याचा दिनांक | ०९/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०९/०६/२०२६ |
| दोषी ठरवल्याचा दिनांक, जर असल्यास | ---- |

**आरोपीची सविस्तर माहिती**

| आ. क्र. | आरोपीचे नांव | अटक केल्याचा दिनांक | जामीन वर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायाल-यीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | अक्षय संतराम तोडकर | २३.०६.२०२१ | २३.०६.२०२१ | २७९, ३०४अ, ३३७, ३३८ भा.दं.वि., १८४ मो.वा.अ. | निर्दोष | ---- | ---- |

## भाग क

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/ आरोपीतर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

**अ**. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १ | धनाजी केरबा वाघमारे | फिर्यादी | २३ |
| २ | सुधीर महादेव जगताप | साक्षीदार | ३० |
| ३ | गोपिनाथ भानुदास सरवदे | साक्षीदार | ३३ |
| ४ | अनिता गोपिनाथ सरवदे | साक्षीदार | ३४ |
| ५ | दत्तात्रय केरबा वाघमारे | घटनास्थळ पंच | ३६ |

**ब**. आरोपीतर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

**क**. न्यायालयीन साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

## अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी

**अ**. अभियोग पक्षाचा पुरावा

| निशाणी क्रमांक | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|
| २४ | फिर्याद (अ.सा.क्र.१) |
| ३७ | घटनास्थळ पंचनामा (अ.सा.क्र.५) |

**ब**. आरोपीतर्फे पुरावा

| निशाणी क्रमांक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

**क**. न्यायालयीन पुरावा

| निशाणी क्रमांक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

**ड**. मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## न्यायनिर्णय

**(घोषित दिनांक ०९ जुन, २०२६)**

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० (यानंतर संक्षिप्तपणे **''भा.दं.वि.''** असे संबोधण्यात येत आहे) चे कलम २७९, ३०४अ, ३३७, ३३८ व मोटार वाहन अधिनियम कलम १८४ अन्वये शिक्षेस पात्र अपराधाबाबत संपरीक्षा चालविण्यात आली आहे.

**<u>अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे कीः–</u>**

२. फिर्यादी धनाजी केरबा वाघमारे यांचे साडु गेले तिन वर्षांपासुन वल्लभ मुरलीधर टेकाळे यांचे कासारखणी ता. वाशी शिवारातील शेतात सालगडी म्हणुन करतात. दिनांक ०६/०६/२०२१ रोजी रात्री ०८.४५ वाजताचे सुमारास ते घरी असताना त्यांची मेव्हणी अनिता सरवदे हिने फोन करून कळविले की, ८.३० वाजताचे सुमारास तिचे पती गोपिनाथ सरवदे व मुलगी वैष्णवी हे गावात दुध देऊन स्कुटीवरुन परत टेकाळे वस्ती येथे येत होते. त्यांची स्कुटी वल्लभ टेकाळे यांचे पोल्ट्री फॉर्म जवळ आली असता समोरुन येणारी मोटारसायकल क्र. एमएच २५ ए.पी. ६६९३ चा चालक आरोपी अक्षय याने स्कुटीला जोराची धडक देऊन अपघात केला. त्यामुळे तिचे पती, तिची मुलगी, आरोपी अक्षय व त्याचे पाठीमागे बसलेला सुधीर जगताप यांना मार लागुन ते जखमी झाल्यामुळे ती तिचा पती व मुलीला सरकारी दवाखाना वाशी येथे घेऊन जात आहे. तिने फिर्यादीस दवाखान्यात येण्यास कळवले.

३. फिर्यादी व त्याची पत्नी जयश्री असे ग्रामीण रुग्णालय वाशी येथे आले असता त्यांनी पाहिले की, त्याचा साडू गोपिनाथ याचे उजव्या पायास मार लागुन पाय फ्रॅक्चर झाला होता व त्याची मुलगी वैष्णवी हिस डोक्यास मार लागुन गंभिर जखमी झाली होती. तेथील डॉक्टरांनी जखमींना पुढील उपचारासाठी

सरकारी दवाखाना उस्मानाबाद येथे पाठवले. तेथुनही पुढे त्यांना सिव्हील हॉस्पीटल सोलापुर येथील दवाखान्यात पाठवले. त्यानंतर दिनांक ०७/०६/२०२१ रोजी जखमी गोपिनाथ यास ससुन हॉस्पीटल पुणे येथे पाठवले. करीता फिर्यादीने घटनेबाबत पोलीस ठाणे वाशी येथे फिर्याद दाखल केली.

४. सदर फिर्याद वरुन आरोपीविरुध्द भा.दं.वि. चे कलम २७९, ३०४अ, ३३७, ३३८ व मोटार वाहन अधिनियम कलम १८४ अन्वये गुन्हा क्र. १८४/२०२१ पोलीस ठाणे वाशी येथे नोंदविण्यात आला.

५. तपासादरम्यान, तपासीक अंमलदार यांनी घटनेशी संबंधीत असलेल्या साक्षीदारांचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १६१ प्रमाणे जबाब नोंदविले. घटनास्थळ पंचनामा नि.क्र. ३७ तयार केला. मरणोत्तर पंचनामा तयार केला. जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र व मयताचा शवविच्छेदन अहवाल प्राप्त केले. आरोपीस गुन्ह्यात अटक केले. आरोपीविरुध्द पुरावा मिळून आल्याने त्यांनी पोलीस ठाणे अधिकारी वाशी यांचे मार्फत न्यायालयात दोषारोप–पत्र सादर केले.

६. दोषारोप–पत्र व त्यासोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन करुन व आरोपींची बाजू ऐकून माझे पुर्वपिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द भा.दं.वि. चे कलम २७९, ३०४अ, ३३७, ३३८ व मोटार वाहन अधिनियम कलम १८४

अन्वये शिक्षेस पात्र अपराधाबाबत नि.क्र. १८ अन्वये दोषारोप निश्चित केला. उक्त दोषारोप आरोपीस त्याच्या भाषेत वाचून व समजावून सांगितला असता, त्याने तो अमान्य असल्याचे सांगून संपरीक्षेची मागणी केली.

७. अभियोगपक्षाचे पुराव्यात आरोपीविरुध्द आलेल्या विपरीत परिस्थितीचे स्पष्टीकरण देण्याची संधी आरोपीस फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ (१) (ब) प्रमाणे नोंदवण्यात आलेल्या निवेदनाद्वारे देण्यात आली. खोट्या गुन्ह्यात गोवण्यात आल्याचा त्याचा बचाव दिसून येतो.

८. मी अभियोग पक्षातर्फे विशेष सहा. सरकारी अभियोक्ता श्री.एस.आर. सय्यद व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. पी. बी. कवडे यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच मी अभिलेखावर असलेल्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले असता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निर्माण होतात. ते मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह खालील प्रमाणे आहेतः–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, दिनांक ०६/०६/२०२१ रोजी सायंकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास वल्लभ टेकाळे यांचे पोल्ट्री फॉर्म जवळ, गोजवडा ते वाशी रोड, ता. वाशी जि. उस्मानाबाद येथे सार्वजनिक रस्त्यावर आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल क्र. एमएच २५ | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | एपी ६६९३ ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मानवी जीवन धोक्यात येईल असे कृत्य करून अपघातास कारणीभुत झाला ? | |
| २. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमुद वाहन हे सार्वजनिक रस्त्यावर भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन स्कुटी क्र. एमएच १३ सीआर ५६८४ ला जोराची धडक देउन मयत वैष्णवी सरवदे हिचे मृत्यूस कारणीभुत झाला जो की सदोष मनुष्यवध होणार नाही ? | नकारार्थी. |
| ३. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमुद वाहन हे सार्वजनिक रस्त्यावर भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन स्कुटी क्र. एमएच १३ सीआर ५६८४ ला जोराची धडक देउन जखमिंना किरकोळ जखमा होण्यास कारणीभुत झाला जो की सदोष मनुष्यवध होणार नाही ? | नकारार्थी. |
| ४. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमुद वाहन हे सार्वजनिक रस्त्यावर भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन स्कुटी क्र. एमएच १३ सीआर ५६८४ ला जोराची धडक देउन जखमिंना गंभिर जखमा होण्यास कारणीभुत झाला जो की सदोष मनुष्यवध होणार | नकारार्थी. |

नाही ?

| | | |
|---|---|---|
| ५. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमुद वाहन हे सार्वजनिक रस्त्यावर भरधाव वेगाने व निष्काळजीपणे, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवुन मानवी जीवन धोक्यात येईल असे कृत्य करून अपघातास कारणीभुत झाला ? | नकारार्थी. |
| ६. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ५ बाबतः–**

**९.** मुद्दा क्र. १ ते ५ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मी ते चर्चेकरीता एकत्रीत घेत आहे. या ठिकाणी नमुद करणे आवश्यक आहे की, अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द भा. दं. वि. चे कलम २७९, ३०४–अ, ३३७, ३३८ व मोटारवाहन कायद्याचे कलम १८४ प्रमाणे दंडणीय असलेल्या अपराधासाठीचा दोषारोप लावलेला आहे. सदर दोषारोप सिध्द करणेकामी आरोपीने त्याचे ताब्यातील वर नमुद वाहन भरधाव वेगात, हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचा साडु गोपिनाथ सरवदे याचे स्कुटीला जोराची धडक देऊन अपघात केला व मयत वैष्णवी हिचे मृत्यूस

कारणीभुत झाला तसेच स्वतःसह इतर दोघांना किरकोळ व गंभिर स्वरुपाच्या जखमा होण्यास कारणीभुत झाला या बाबी अभियोगपक्षाने वाजवि संशयापलिकडे सिध्द करणे आवश्यक आहे.

**१०.** कायद्याचे स्थापीत तत्वानुसार सदरचा दोषारोप वाजवी संशयापलिकडे जाउन सिध्द करण्याची जबाबदारी ही अभियोगपक्षाचीच आहे. अभियोगपक्षाचे प्रकरणात उत्पन्न झालेल्या वाजवी संशयाचा फायदा हा नेहमी आरोपीला द्यावा लागतो हे न्यायतत्व आहे.

**११.** फिर्यादी धनाजी वाघमारे (स.सा.क्र.१), नि.क्र. २३ यांनी त्यांचे पुराव्यात सांगीतले की, दिनांक ०६/०६/२०२१ रोजी त्याचे साडु गोपिनाथ सरवदे हा वल्लभ टेकाळे यांच्या शेतावर सालाने कामाला होता. तो टेकाळे यांच्या घरी दुध घालायला स्कुटीवरुन आला होता व त्याच्या सोबत त्याची बारा वर्षाची मुलगी होती. गोपिनाथ हा परत शेताकडे जात असताना रात्री ८.३० वाजताचे सुमारास वल्लभ टेकाळे याच्या पोल्ट्री फॉर्म जवळ आला असता समोरुन येणारी मोटारसायकल क्र. एमएच २५ एपी ६६९३ ने त्यांना धडक दिली. फिर्यादीची मेव्हणी हिने रात्री ९.४५ वाजता फिर्यादीस फोन करून घटनेची माहिती दिली व हॉस्पीटलला बोलावले. त्यामुळे फिर्यादी व त्याची पत्नी वाशी येथील दवाखान्यात गेले असता जखमी उस्मानाबाद येथे नेण्यास सांगीतले. त्यानंतर जखमी गोपिनाथ व वैष्णवी यांना सोलापुर येथील दवाखान्यात नेण्यास सांगीतले. वैष्णी हिस

सोलापुर येथील दवाखान्यात ठेऊन घेतले व गोपिनाथ यास पुणे येथील ससुन रुगणालयात पाठविले. गोपिनाथ याचे पाय गुडघ्यापासुन खालुन गेले होते. वैष्णवी हिच्या डोक्याला मार लागल्यामुळे उपचारादरम्यान ती मयत झाली. त्यामुळे त्याने फिर्याद नि.क्र. २४ नोंदवली.

**१२.** उलटतपासादरम्यान त्याने सांगीतले की, त्याने मोटारसायकलचा क्रमांक हातावर लिहुन घेतला आहे. त्याने अपघात प्रत्यक्ष पाहिलेला नाही. त्याने आरोपीला कधीही पाहिलेले नाही.

**१३.** जखमी गोपिनाथ सरवदे अ.सा.क्र. ३, नि.क्र. ३३ याने सांगीतले की, दिनांक ०६/०६/२०२१ रोजी तो स्कुटीवरुन दुध घालण्यासाठी गावामध्ये आला होता. त्याची मुलगी वैष्णवी ही त्याचे पाठीमागे बसली होती. रात्री ८.३० वाजेच्या सुमारास परत जात असताना तो दसमेगाव रोडवरील वल्लभ टेकाळे याचे पोल्ट्रीफॉर्म जवळ आला असता समोरुन मोटारसायकल क्र. एमएच २५ ए पी ६६९३ ही त्याचे अंगावर आली व अपघात झाला. अपघातात त्याची मुलगी पाठीमागे पडली व तिचे डोक्याला मेंदूला मार लागला. तसेच त्यालाही डोक्याला, हानुवटीला, हाताला व पायाला मार लागला. त्याचा पाय मोडला होता. त्यानंतर तो वाशी येथील दवाखान्यात गेला. तेथुन त्यांना उस्मानाबाद व तेथुन पुढे सोलापुर येथील दवाखान्यात पाठवले. त्याचे मुलीला सोलापुर येथे दाखल करुन घेऊन त्याला ससुन हॉस्पीटल पुणे येथे पाठवले. तो बेशुध्द होता.

त्याची मुलगी दवाखान्यात असताना मयत झाली. त्यास धडक देणारी मोटारसायकल आरोपी चालवत होता.

**१४.** सदर साक्षीदाराने त्याचे उलटतपासादरम्यान मान्य केले की, रस्त्याच्या दोन्ही बाजुला लाईटची व्यवस्था नाही. रात्रीच्या वेळी समोरुन येणाऱ्या गाडीवरुन कोण येत आहे हे दिसत नाही.

**१५.** अनिता (अ.सा.क्र.४), नि.क्र. ३४ यांचे पुराव्यात असे आले आहे की, दिनांक ०६/०६/२०२१ रोजी संध्याकाळी ८.३० वाजता टेकाळे वस्तीजवळ अपघात झाला होता. आरोपीच्या मोटारसायकलचा क्रमांक एमएच २५ – ६६९३ असा आहे. समोरच्या गाडीने तिचा पती गोपिनाथ याच्या गाडीला धडक दिली होती. तिचे पतीच्या पाठीमागे तिची मुलगी वैष्णवी होती. तिचे पतीच्या डोक्याला व हाताला मार लागला होता व पाय मोडाला होता. तिचे मुलीला पाठीमागे डोक्याला मार लागला होता. तिचा पती व मुलीला प्रथम वाशी येथील दवाखान्यात तेथुन उस्मानाबाद येथे व पुढे सोलापुर येथे पाठवले. तिचे मुलीला सोलापुर येथे ठेऊन घेतले व पतीला ससुन दवाखान्यात पाठवले. तिच्या मुलीचा चार दिवसानंतर मृत्यू झाला.

**१६.** उलटतपासादरम्यान सदर साक्षीदाराने सांगीतले आहे की, तिने घटना प्रत्यक्ष पाहिलेली नाही. तिला सर्व माहिती लोकांकडून मिळाली. त्यावेळी

रस्त्याच्या दोन्ही बाजुला लाईट नव्हती.

**१७.** प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तथा जखमी सुधीर जगताप (अ.सा.क्र.२)– नि.क्र. ३० यांनी त्यांचे पुराव्यात सांगीतले की, घटना लॉकडाऊन मध्ये संध्याकाळी घडली होती. तो गोजवडा येथुन गाडीवर बसला होता. ती गाडी आरोपी अक्षय याची होती. त्याला बाकी काही आठवत नाही. सदर साक्षीदार अभियोगपक्षास मदत करत नसल्यामुळे अभियोगपक्षातर्फे त्यास फितुर घोषीत करुन न्यायालयाचे परवानगीने त्याला उलटतपासाच्या स्वरुपात उत्तर सुचक प्रश्न विचाले. परंतु, उलटतपासादरम्यानही त्याचे तोंडून अभियोगपक्षाचे प्रकरणाचे पुरक अशी कोणतीही बाब अभिलेखावर आलेली नाही.

**१८.** दत्तात्रय अ.सा.क्र.५ घटनास्थळ पंच – नि.क्र. ३६ याने त्याचे पुराव्यादरम्यान सांगीतले की, दिनांक १०/०६/२०२१ रोजी ७.०० ते ७.३० वाजेच्या दरम्यान तो शेतातुन जात असताना पोलीसांनी त्याला कळंब ते वाशी रोडवर टेकाळे पोल्ट्री फॉर्मजवळ अपघाताबाबत पंचनामा करण्यासाठी बोलावले होते. सदर ठिकाणी स्कुटी पडलेली होती व रस्त्यावर काच वगैरे फुटलेले होते. स्कुटी फुटलेली होती. त्यावेळी तेथे ईश्वर लगास व पोलीस हजर होते. पोलीसांनी त्याचे समक्ष घटनास्थळ पंचनामा नि.क्र. ३७ केला.

**१९.** उलटतपासात त्याने सांगीतले की, फिर्यादी हा त्याचा भाऊ आहे

व जखमी गोपिनाथ हा त्याचे भावाचा साडु आहे. अपघात हा दिनांक १०/०६/२०२१ रोजी घडला आहे. तो शेतातुन घरी जात असताना घटनास्थळी थांबला असता पोलीसांनी त्याची सही घेतली होती.

२०. सदर प्रकरणामध्ये सरकारपक्षाने सादर केलेल्या संपुर्ण पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, फिर्यादी धनाजी अ.सा.क्र.१ तसेच अ.सा.क्र. ४ अनिता सरवदे हे दोन्ही साक्षीदार यांनी मान्य केलेले आहे की, घटनेच्या वेळी ते घटनास्थळी हजर नव्हते व घटना प्रत्यक्ष पाहिलेली नाही. त्यामुळे सदर दोन्ही साक्षीदारांची साक्ष आरोपीविरुध्दचे गुन्हे सिध्द करण्यासाठी उपयुक्त होणार नाही.

२१. तसेच वर नमुद केल्याप्रमाणे प्रत्यक्ष साक्षीदार सुधीर महादेव जगताप हा सरकारपक्षास मदत करत नाही. गोपिनाथ भानुदास सरवदे अ.सा.क्र. ३ याचा पुरावा पाहिला असता त्याने असे सांगीतले आहे की, घटनेच्या वेळी त्याच्या समोरुन एमएच २५ एपी ६६९३ही मोटारसायकल येत होती व ती त्याच्या अंगावर आली. त्याच्या पाठीमागे त्याची मुलगी वैष्णवी पाठीमागे अपघातात पडल्यामुळे मेंदूला मार लागला. सदर साक्षीदारालाही मार लागुन तो जखमी झाला. सदर साक्षीदार हा महत्वाचा साक्षीदार असुन त्याचा उलटतपास पाहिला असता असे दिसुन येते की, तो स्पष्टपणे सांगतो की घटना रात्री ८.३० वाजेची होती व रस्त्याच्या दोन्ही बाजुंना लाईटची व्यवस्था नव्हती. समोरुन गाडी

वरुन कोण येत आहे हे ही दिसत नाही. घटनेच्या वेळी तो मार लागुन गंभिर जखमी झाला होता. त्यामुळे सदर समोरुन येणारा वाहनचालक त्याने पाहिला आहे याबाबत विश्वास निर्माण होत नाही. त्यामुळे सदर गुन्हे सदर आरोपीने केले याबाबत संशय निर्माण होतो.

२२. घटना ही दिनांक ०६/०६/२०२१ रोजी घडली असुन फिर्याद दिनांक ०९/०६/२०२१ रोजी दिली असल्याचे दिसुन येते. सदर फिर्याद देण्यास उशिर का झाला याचे समाधानकारक कारण सरकारपक्षाने दाखल केलेले नाही. फिर्याद ही जखमीने दिलेली नसुन फिर्यादीने दिलेली आहे. त्यामुळे सदर फिर्यादीने सदर फिर्याद लवकरात लवकर देणे अपेक्षित आहे. परंतु, उशिर का झाला याचे स्पष्टीकरण सरकारपक्षाने सादर केलेले नाही. सदर बाबी पाहता सदर आरोपीने सदर गुन्हे केले याबाबत संशय निर्माण होतो.

२३. फौजदारी प्रकरणांमध्ये सरकारपक्षाने आरोपीविरुध्दचे गुन्हे हे स्वतंत्र, पुरेसा, पुरक, विश्वासार्ह, स्विकारार्य अशा प्रकारच्या पुराव्याद्वारे सिध्द करणे अवश्यक आहे. परंतु, सदर प्रकरणामध्ये एकही स्वतंत्र असा साक्षीदार सरकारपक्षास मदत करत नाही. त्यामुळे आरोपीविरुध्दचे गुन्हे सरकारपक्षाने संशयापलिकडे सिध्द केल्याचे दिसुन येत नाही.

२४. स्थापीत कायद्यानुसर अभियोगपक्षाच्या पुराव्यात येणाऱ्या प्रत्येक

संशयाचा फायदा आरोपीस देणे हे न्यायतत्व आहे. वर नमूद केल्याप्रमाणे अभियोग पक्षाने आरोपीचा गुन्ह्यात सहभाग होता व सदर अपघात आरोपीचा तथाकथीत कृत्यामुळे घडला होता हीच बाब सिध्द केलेली नाही. त्यामुळे भा.दं.वि.चे कलम २७९, ३०४अ, ३३७, ३३८ व मोटार वाहन अधिनियम कलम १८४ अन्वये दोषारोप सिध्दीसाठी जे महत्वाचे घटक आहेत तेच अभियोग पक्ष सिध्द करीत नाहीत या निष्कर्षाप्रत मी आले आहे. करीता वरील नमूद कारणास्तव मी मुद्दा क्र. १ ते ५ चा निष्कर्ष **नकारार्थी** नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ६ बाबत–**

**२५.** मुद्दा क्र. १ ते ५ चे निष्कर्षांचा विचार करता अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेला दोषारोप हा वाजवी संशयापलिकडे जाउन सिध्द केलेला नाही. त्यामुळे आरोपीस त्याचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपातुन मुक्त करणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. ६ च्या अनुषंगाने खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१.** आरोपी अक्षय संतराम तोडकर याची भा.द.वि.चे कलम २७९, ३०४अ, ३३७, ३३८ व मोटार वाहन अधिनियम कलम १८४ अन्वये शिक्षेस पात्र अपराधांमधून फौ.प्र.सं. कलम २५५(१) अन्वये मुक्तता करण्यात येते.

**२.** आरोपीचा वैयक्तीक जातमुचलका व जामीनकतबा रद्द करण्यात येत आहे.

३. जप्त वाहनाबाबतचे बंधपत्र अपीलकालावधी नंतर कायम करण्यात येते.

४. आरोपीने फौ.प्र.सं. कलम ४३७–अ अन्वये रक्कम रुपये ५०,०००/– चा जातमुचलका द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

MAHADEVI VISHAL PATIL
Digitally signed by MAHADEVI VISHAL PATIL
Date: 2026.06.09 16:07:35 +0530

वाशी.

दिनांकः ०९/०६/२०२६.

(श्रीमती एम.व्ही. पाटील–राठोडे)
न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग, वाशी.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | A.M.Wagh, Stenographer (G-III) |
| Name of the Court | --- | C.J.J.D. & J.M.F.C. Court Washi |
| Date of judgment | --- | 09/06/2026 |
| Order signed by the Presiding officer on | –- | 09/06/2026 |
| Order uploaded on | – | 09/06/2026 |